28-06-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 6/27/2025 11:41 PM Page 1



‘ड्रग्ज’ रॅकेट चालवणाऱ्या योग गुरूचे गोवा कनेक्शन उघड पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



रोनाल्डो दरवर्षी कमावणार २ हजार कोटी ! पान ४ वर

वेर्णा, शनिवार, २८ जून २०२५ | पाने ४ | ₹ ४ | REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 296 | Verna, | facebook.com/dainikherald | Saturday 28 June 2025 | Pages 4 | ₹ 4

# सर्वसमावेशक कचरा धोरण लवकरच : मुख्यमंत्री

■ टीम दैनिक हेराल्ड :

**पणजी, दि. २७ : राज्यातील सर्व प्रकारच्या कचऱ्याचे व्यवस्थापन आणि नियमन सुनिश्चित करण्यासाठी गोवा सरकार लवकरच एक व्यापक धोरण लागू करणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी शुक्रवारी केली. गोवा सरकारने हे सर्वसमावेशक कचरा व्यवस्थापन धोरण जाहीर केलं असलं तरी प्रत्यक्षात राज्याला आजही गंभीर कचरा संकटाचा सामना करावा लागत आहे. शहरी असो वा ग्रामीण, किनारी परिसर असो वा पर्यटनस्थळं , कचऱ्याचा प्रश्न हा प्रत्येक भागासाठी अडचण बनला आहे. सरकारची नियोजनशून्यता, स्थानिक प्रशासनांची अकार्यक्षमता आणि विकेंद्रित व्यवस्थेचा अभाव यामुळे गोवा आज स्वच्छ नसलेले ’ राज्य ठरत आहे.**



मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी जरी सर्व प्रकारच्या कचऱ्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी धोरणात्मक पावलं उचलण्याची घोषणा केली असली, तरी प्रत्यक्षात किंवा राबविण्याची यंत्रणा कोलमडल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत.

ही घोषणा करताना मुख्यमंत्री म्हणाले की , गोवा स्वच्छ ठेवण्यासाठी सर्वच प्रकारच्या कचऱ्याचे काटेकोर नियमन आवश्यक आहे. जैववैद्यकीय कचऱ्यात शिस्त आल्यासारखी वाटते, पण रासायनिक, औद्योगिक आणि बांधकाम कचऱ्यावर अजूनही ठोस नियंत्रण नाही, पण त्याच वेळी त्यांनी ही कबुलीही दिली की, ३५० पैकी फक्त ५० धोकादायक कचरा उत्पादक संस्थाच अधिकृत सुविधांचा उपयोग करत आहेत.

या धोरणांपलीकडे, खऱ्या अडचणी गावपातळीवर आहेत, असा थेट आरोप माजी कचरा व्यवस्थापन मंत्री आणि कळंगुटचे आमदार मायकल लोबो यांनी केला आहे.

त्यांनी कळंगुट येथे शुक्रवारी घेतलेल्या पत्रकार परिषदेत सांगितलं की, ग्रामपंचायतींकडून कचरा संकलन नीट होत नाही. नागरिक नाल्यात, नदीत, शेतात कचरा टाकतात आणि तो सरळ समुद्रात जातो. त्यामुळे समुद्रकिनाऱ्यांवर प्रचंड कचरा जमा होतो. हे दृश्य पाहून पर्यटकही गोंधळून जातात आणि पर्यटनावर परिणाम होतो.

लोबो यांनी राज्य सरकारला थेट इशारा दिला की जर गावपातळीवर कचरा संकलन आणि व्यवस्थापनाला प्राधान्य न दिलं गेलं, तर पर्यटन उद्योग रसातळाला जाईल.फक्त पर्यटन खात्याचे कंत्राटदार रोज कचरा उचलत राहणार, पण गावांमधून कचरा समुद्राकडे वाहात राहणार . ही स्थिती टिकू शकत नाही, असं ते म्हणाले.


याच कचरा व्यवस्थापन धोरणाचं सर्वात धोकादायक स्वरूप साळगाव जीटीपी प्रकल्पामध्ये पाहायला मिळतं आहे. या प्रकल्पाचा मूळ उद्देश बार्देश तालुक्यापुरता मर्यादित असतानाही, आज तो संपूर्ण गोव्याचा कचरा स्वीकारतो आणि दिवसाला ३०० टनांहून अधिक कचरा तिथे पोहोचतो.स्थानिक आमदार डॉ. केदार नाईक यांनी याबाबत थेट प्रशासनालाच इशारा दिला आहे:साळगाव हे डंपिंग ग्राउंड नाही. आम्ही केवळ आमच्या तालुक्याचा कचरा स्वीकारण्यासाठी तयार होतो. जर दक्षिण गोव्याचा कचरा येथे पाठवला गेला, तर लोक ट्रक अडवायला तयार आहेत.

त्यांनी स्पष्ट केलं की , प्रकल्पावरचा ताण अतिशय गंभीर झाला असून परिसरात दुर्गंधी आणि पर्यावरणदूषण वाढत आहे, ज्याचा थेट परिणाम पर्यटनस्थळांवरही होत आहे.

या घटनांची एकत्रित पाहणी केल्यास, गोवा सरकारसमोर कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न उभा राहिला आहे. एकीकडे धोरण तयार होतंय, पण अंमलबजावणी शून्य आहे.दुसरीकडे गावपातळीवर यंत्रणा निष्क्रिय असून, त्याचा परिणाम किनाऱ्यांपासून पर्यटनावर होत आहे.तिसरीकडे एकाच प्रकल्पावर सर्व राज्याचा भार टाकल्यामुळे स्थानिक असंतोष ज्वालामुखीप्रमाणे उफाळतो आहे.

तज्ज्ञांच्या मते आणि स्थानिक प्रतिनिधींच्या सूचनांवरून, राज्याला तातडीने विकेंद्रित कचरा प्रक्रिया प्रकल्पांची गरज आहे.

प्रत्येक तालुक्यात स्थानिक स्तरावर प्रक्रिया केंद्रं उभारली, तरच स्वच्छ, हरित आणि जबाबदार गोवा’ हे सरकारचं स्वप्न प्रत्यक्षात उतरेल असे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे.




## निवडक

### भारतासंबंधी गुप्त माहिती चीन पाकिस्तानला देतो

**इस्लामाबाद, दि. २७ :** पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताकडून ऑपरेशन सिंदूरद्वारे पाकिस्तान मधील दहशतवादी तळे नष्ट करण्यात आली होती.
शस्त्रसंधीनंतरही ही पाकला भीती सतावत असून पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांनी एक मोठी गोष्ट कबूल केली आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यात झालेल्या लष्करी तणावानंतर चीन पाकिस्तानला मदत करत आहे, असे त्यांनी सांगितले. चीन भारताविषयीची माहिती पाकिस्तानसोबत शेअर करत आहे, असेही ते म्हणाले. अरब न्यूजला दिलेल्या मुलाखतीत आसिफ म्हणाले, मित्र राष्ट्रांना सॅटेलाइट किंवा इतर माध्यमातून मिळालेली गुप्त माहिती देणे ही सामान्य गोष्ट आहे. चीनचेही भारतासोबत काही वाद आहेत, त्यामुळे ते मदत करत आहेत, असेही त्यांनी सांगितले. आसिफ यांनी याबद्दल अधिक माहिती दिली. ते म्हणाले, आजकाल जे देश एकमेकांच्या जवळ आहेत, ते गुप्त माहितीची देवाणघेवाण करतात. आम्हीही त्यांच्यासोबत माहिती शेअर करतो. यात काही नवीन नाही.
आसिफ म्हणाले, जर आम्ही अशी माहिती शेअर केली, ज्यामुळे आम्हाला किंवा चीनला धोका निर्माण होऊ शकतो, त्यामुळे हे खूप स्वाभाविक आहे. कारण चीनचेही भारतासोबत काही मुद्द्यावरून वाद आहेत. पाकिस्तानचे संरक्षण मंत्री पुढे म्हणाले की, भारतासोबत झालेल्या लष्करी संघर्षानंतर इस्लामाबाद हाय अलर्टवर आहे.

### इस्रायलसोबत युद्धानंतर इराणची अफगाणिस्तानवर मोठी कारवाई

**नवी दिल्ली, दि. २७:** इराण आणि इस्रायलमध्ये भीषण युद्ध झालं, या युद्धामध्ये दोन्ही देशांचं मोठं नुकसान झालं आहे. अखेर आता दोन्ही देशांकडून युद्धविरामाची घोषणा करण्यात आली आहे.
युद्धवीरामानंतर आता इराणने अफगाणिस्तानविरोधात मोठं पाऊल उचललं आहे. सध्या अफगाणिस्तानमध्ये तालिबाणची सत्ता आहे. युद्धात मदत केली नाही, इराणला समर्थन दिलं नाही म्हणून इराणने ही कारवाई सुरू केल्याचं बोललं जात आहे. इराणमध्ये अवैध मार्गानं घुसखोरी केलेल्या अफगाणी नागरिकांची इराणमधून हकालपट्टी सुरू आहे, तर दुसरीकडे तेहरामध्ये आलेल्या अनेक अफगाणिस्तानी नागरिकांना अटक करण्यात आली आहे.
मिळत असलेल्या माहितीनुसार शेजारी राष्ट्र असून देखील अफगाणिस्तानने युद्धादरम्यान इराणची कोणतीच मदत केली नाही, त्यांना समर्थन दिलं नाही, म्हणून ही कारवाई करण्यात आली आहे. इराण सध्या अफगाणिस्तान विरोधात कडक भूमिका घेण्याच्या तयारीमध्ये आहे.

### इराणविरुद्धचं युद्ध थांबताच इस्रायलचा मोर्चा लेबनॉनवर

**तेल अवीव, दि. २७ :** इराण आणि इस्रायल यांच्यातील युद्ध संपून अवघे चार दिवस उलटले आहेत. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी शस्त्रसंधीची घोषणा करत इराण आणि इस्रायल यांच्यातील संघर्ष थांबवला. दोन्ही देशांमध्ये १२ दिवस युद्ध चाललं. इराणविरुद्धचा संघर्ष थांबून अवघे ४ दिवस उलटलेले असताना आता इस्रायलनं लेबनॉनवर हल्ला केला आहे. दक्षिण लेबनॉनच्या डोंगराळ भागांवर इस्रायलनं मोठ्या प्रमाणात बॉम्बफेक केलेली आहे.
हिजबुल्लाहच्या मालमत्तांना लक्ष्य करण्यासाठी इस्रायलनं हल्ले केले आहेत. इराणसोबतचा संघर्ष थांबताच इस्रायलनं हिजबुल्लाहवरील हल्ले अधिक तीव्र केले आहेत.
लेबनॉनच्या सरकारी राष्ट्रीय वृत्तसंस्थेनं दिलेल्या माहितीनुसार, नाबातियेहच्या डोंगरांवर दोनदा हवाई हल्ले करण्यात आले. बंकर बस्टर बॉम्बचा वापर करण्यात आला. या हल्ल्यातील जीवितहानीबद्दल अद्याप तरी कोणताही तपशील समोर आलेला नाही. नोव्हेंबरमध्ये अमेरिकेच्या मध्यस्थीनं झालेली शस्त्रसंधी १४ महिने चालली.

## ऑपरेशन ‘फ्लश आउट’ अंतर्गत ५६ परदेशींविरोधात कारवाई

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. २७ :** ऑपरेशन फ्लशआउट’ अंतर्गत गोवा पोलिसांनी राज्यात अवैधपणे थांबणाऱ्या परदेशी नागरिकांविरोधातील कारवाई तीव्र केली असून, गेल्या सहा महिन्यांत एकूण ५६ कारवाया करण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे यापैकी तब्बल ३५ प्रकरणे केवळ मे आणि जून महिन्यांमध्ये नोंदवली गेली आहेत.

गोवा पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १ जानेवारी ते २७ जून २०२५ या कालावधीत परदेशी प्रादेशिक नोंदणी कार्यालयाने ७७ परदेशी नागरिकांना देशाबाहेर हद्दपार केले. यामध्ये ३२ पुरुष व ४५ महिलांचा समावेश आहे .

हद्दपार करण्यात आलेल्या परदेशीयांमध्ये २६ बांगलादेशी, २५ रशियन, १८ युगांडन, तर युके व युक्रेन येथील प्रत्येकी दोन आणि पोलंड, मोरोक्को, नायजेरिया, मॉरिशस, बेलारूस व अर्जेंटिना येथील प्रत्येकी एक नागरिकांचा समावेश आहे.

पोलिसांनी स्पष्ट केले की, देशाच्या सुरक्षेच्या दृष्टीने अशा अवैध स्थलांतरितांविरोधातील कारवाई भविष्यातही सुरूच राहणार आहे.तसेच, परदेशी नागरिकांना निवास व्यवस्था पुरवणाऱ्यांना सी–फॉर्म भरून ऑनलाइन पोर्टलवर त्यांच्या आगमनानंतर २४ तासांच्या आत माहिती सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. याशिवाय, परदेशी नागरिक संबंधित ठिकाण सोडल्यावर त्याचे क्रॉस–एंट्री अपडेट करणेही बंधनकारक असल्याचे सांगण्यात आले आहे.

कोणत्याही परिसरात अवैधरीत्या राहणारे किंवा निवास परवाना समाप्त होऊनही थांबलेले परदेशी नागरिक आढळल्यास नागरिकांनी त्वरित जवळच्या पोलीस ठाण्यात माहिती द्यावी, असे आवाहन पोलिसांनी केले आहे. वेळेवर तक्रार केल्यास राज्यात कायदा–सुव्यवस्थेच्या राखणीत मदत होईल, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

## अधिवेशनासाठी प्रश्न पाठवण्याचे विरोधी पक्षांचे आवाहन

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. २७ :** गोवा विधानसभेचे पावसाळी अधिवेशन २१ जुलैपासून सुरू होत असून, त्या पार्श्वभूमीवर आम आदमी पक्ष (आप) आणि गोवा फॉरवर्ड पार्टी यांनी राज्यातील जनतेला थेट सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. या दोन्ही पक्षांनी नागरिकांनी आपले प्रश्न, तक्रारी आणि सूचना पाठवाव्यात, जेणेकरून त्या अधिवेशनात सशक्तपणे मांडता येतील.

आप’चे आमदार व्हेंझी व्हिएगस आणि क्रूझ सिल्वा यांनी विधानसभेत उपस्थित राहणाऱ्या विविध प्रशासकीय विभागांबाबत प्रश्न तयार करण्यासाठी जनतेकडून सहकार्य मागितले आहे. त्यांनी स्पष्ट केले की, गोव्यातील सर्वसामान्य नागरिक, माजी व सध्याचे शासकीय अधिकारी, तसेच माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी आपले प्रश्न पाठवावेत.

आरटीआय कार्यकर्त्यांकडून आलेल्या प्रश्नांमुळे विधानसभा चर्चेतील माहिती मिळवणे अधिक प्रभावी होईल, असे व्हिएगस यांनी सांगितले. त्यांनी आश्वासन दिले की, भलेही आपचे फक्त दोन आमदार आहेत, तरीही ते गोमंतकीयांचा आवाज बनून काम करतील आणि त्यांच्या समस्या सभागृहात उठवतील.

गोवा फॉरवर्ड पार्टी ने आमचो आवाज विजय नावाचा राज्यव्यापी उपक्रम जाहीर केला आहे. यामध्ये अध्यक्ष आणि आमदार विजय सरदेसाई हे पेडणेपासून काणकोणपर्यंत थेट जनतेशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेणार आहेत.

ही मोहीम २९ जून रोजी पेडणेच्या भगवती हॉलमध्ये सुरू होणार असून, त्यानंतर ३० जूनला बार्देश तालुक्यासाठी म्हापसा रेसिडेन्सी येथे कार्यक्रम होणार आहे. यानंतर अनेक तालुक्यांमध्ये सरदेसाई मेळावे घेणार आहेत .

राज्यातील नागरिकांनी त्यांच्या तक्रारी, सूचना व मुद्दे "publicsuggestionsgoaforward.in" या ईमेलवर १० जुलैपर्यंत पाठवावेत, असे गोवा फॉरवर्ड ने आवाहन केले आहे. जीएफपी च्या मते ही एक लोकशाहीसाठी सकारात्मक संधी असून, विधानसभेच्या माध्यमातून थेट जनतेच्या आवाजाला विधानभवनात पोहोचवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

दोन्ही विरोधी पक्षांचा उद्देश एकच आहे गोव्यातील सामान्य नागरिकांच्या समस्या अधिकृत स्तरावर मांडणे. त्यामुळे यंदाच्या पावसाळी अधिवेशनात जनतेने विचारलेल्या प्रश्नांमुळे सरकारच्या कारभारावर ठोस चर्चा होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## मुख्यमंत्री प्रमोद सावंत कला अकादमीचे नवे अध्यक्ष

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. २७ :** मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांची गोवा राज्य कला अकादमीच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली असून, ही नियुक्ती तात्काळ प्रभावाने लागू करण्यात आली आहे. यापूर्वी हे पद माजी कला आणि संस्कृती मंत्री आमदार गोविंद गावडे यांच्याकडे होते.

राज्यपालांच्या आदेशानुसार, कला अकादमीच्या घटनेच्या कलम ५ अंतर्गत मिळालेल्या अधिकारांचा वापर करून मुख्यमंत्री सावंत यांना पुढील आदेशापर्यंत अध्यक्षपद भूषविण्यासाठी नियुक्त करण्यात आले आहे. आदेशात नमूद करण्यात आले आहे की, पणजी येथील कला अकादमीच्या अध्यक्षपदी मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत तात्काळ प्रभावाने कार्यभार स्वीकारतील.

ही नियुक्ती म्हणजे मुख्यमंत्री सावंत यांनी १८ जून रोजी गोविंद गावडे यांना मंत्रिमंडळातून वगळल्यानंतरचा पुढील टप्पा आहे. यानंतर गावडे यांच्या मंत्रिपदावरून व कला, संस्कृती, क्रीडा आणि ग्रामीण विकास विभागातील त्यांच्या जबाबदाऱ्यांबाबत गेले काही आठवडे सुरू असलेले तर्कवितर्क संपुष्टात आले आहेत.

दरम्यान, कला क्षेत्रातील स्थानिक संघटना आणि कलाकार गटांनी गोव्याच्या प्रतिष्ठित कला अकादमीच्या सध्याच्या कार्यप्रणालीवर नाराजी व्यक्त करत निदर्शने सुरू केली आहेत. कला राखण मांड’ या संघटनेने पणजीतील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुख्यालयाबाहेर निदर्शने करत, कला अकादमीतील ढासळत्या स्थितीसाठी जबाबदार अधिकाऱ्यांविरोधात कारवाईची मागणी केली आहे.

या गटाने नुकतेच पूर्ण झालेल्या राज्यस्तरीय कला व सांस्कृतिक संकुलाच्या दुरुस्ती कामांचे तातडीने स्ट्रक्चरल ऑडिट करण्याची मागणी करत, सार्वजनिक निधीचा सदुपयोग झाला की गैरवापर याबाबत पारदर्शक चौकशीची गरज असल्याचे अधोरेखित केले आहे.

## कला अकादमीच्या स्ट्रक्चरल ऑडिटसाठी जोरदार आंदोलन

■ *टीम दैनिक हेराल्ड*

### पीडब्ल्यूडी मुख्यालयाबाहेर कला राखण मांड’ ची निदर्शने

**पणजी, दि. २७ :** गोवा कला अकादमीच्या इमारतीच्या दुरुस्तीबाबत गुणवत्ता आणि पारदर्शकतेवर गंभीर प्रश्न उपस्थित करत कला राखण मांड’ या सांस्कृतिक संघटनेने अल्तिन्हो येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या (पीडब्ल्यूडी) मुख्यालयाबाहेर शुक्रवारी निदर्शने केली. त्यांनी कामाच्या व्यापक स्ट्रक्चरल ऑडिटची मागणी रत संबंधित अधिकाऱ्यांकडून समाधानकारक माहिती न मिळाल्याबद्दल नाराजी व्यक्त केली.



कला राखण मांडचे संयोजक देविदास आमोणकर यांनी सांगितले की,पीडब्ल्यूडीकडे मागितलेली कागदपत्रे अजूनही आम्हाला मिळालेली नाहीत. कलाकारांसाठी उपलब्ध असलेल्या सुविधांची अवस्था अत्यंत वाईट असून, ब्लॅक बॉक्स, आर्ट गॅलरी व ओपन एअर ऑडिटोरियममध्ये अनेक त्रुटी आहेत. आम्ही पुढील तीन दिवसांत पुन्हा निदर्शने करू, कारण आम्ही मिळालेल्या उत्तरांनी समाधानी नाही.

याबाबत सामाजिक कार्यकर्त्या सेसिल रॉड्रिग्ज यांनी या निदर्शनात बोलताना स्पष्ट केले की, कला अकादमीत एअर कंडिशनिंग सुविधा कार्यरत नाहीत, इनडोअर हॉलच्या वर गिटार वर्ग नेले गेले आहेत, ज्यामुळे विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना त्रास सहन करावा लागत आहे. त्यांनी मुख्य अभियंत्यांना कला अकादमीच्या जागेची पाहणी करण्याची विनंती केली.

फ्रान्सिस कोएल्हो यांनी सांगितले की, टास्क फोर्सच्या पहिल्या बैठकीत मागवलेली कागदपत्रे पीडब्ल्यूडीने अद्याप सादर केलेली नाहीत. मुख्यमंत्र्यांच्या बैठकीतही अभियंत्यांना ती कागदपत्रे देण्याचे स्पष्ट आदेश दिले गेले होते. त्यांच्या म्हणण्यानुसार, टास्क फोर्सने ऑक्टोबर २०२४ मध्येच दुरुस्ती व पान २ ▶

## मडकईकर प्रकरण : एसीबी उच्च न्यायालयात

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. २७ :** माजी मंत्री पांडुरंग मडकईकर यांनी केलेल्या कथित भ्रष्टाचाराच्या विधानांविषयी एफआयआर नोंदवण्याचे व कार्यवाही करण्याचे आदेश सत्र न्यायालयाने दिल्यानंतर, त्या आदेशाला आव्हान देत दक्षता विभागाच्या भ्रष्टाचारविरोधी शाखेने मुंबई उच्च न्यायालयात फौजदारी पुनरीक्षण याचिका दाखल केली आहे.

मडकईकर यांनी ४ मार्च २०२५ रोजी माध्यमांशी बोलताना असा दावा केला होता की,फाईल क्लिअर करण्यासाठी त्यांना १५ ते २० लाख रुपये खर्च करावे लागले आणि सरकारमधील सर्वच मंत्री पैसे मोजण्यात व्यग्र असल्याचे वक्तव्य केले होते. या विधानामुळे राज्यात खळबळ उडाली होती.त्यानंतर काशीनाथ शेट्ये, सुदीप ताम्हणकर आणि इतरांनी या प्रकरणात वारंवार तक्रारी दाखल केल्या होत्या आणि संबंधित मंत्र्यांविरोधात चौकशीची मागणी केली होती.

पुनरीक्षण अर्जात एसीबीने नमूद केले आहे की, त्यांनी याप्रकरणी चौकशी करून मडकईकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे जबाब नोंदवले आहेत. चौकशीत मडकईकर आणि विष्णू तिवरेकरयांनी स्पष्ट केले कीफाईल क्लिअर करण्यासाठी **कोणतीही लाच मागण्यात आलेली नाही. जमिनीच्या रूपांतरणासाठी लागणारी फी आणि दंड ही रक्कम अधिकृतपणे सरकारी तिजोरीत भरली गेली होती.तिवरेकर यांच्या म्हणण्यानुसार, मडकईकर यांच्याशी झालेला संवाद हा गैरसमज होता, ज्यामुळे वाटले की २० लाख रुपये मंत्र्यांना द्यावे लागतील. प्रत्यक्षात ती रक्कम अधिकृत शुल्क होती.

मडकईकर यांनीही नोंदवलेल्या जबाबात सांगितले की, त्यांच्या